**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
*A.Y. 2024-2025*

# आधार संस्थेमार्फत शुक्रवारी पाटणमध्ये प्रा. वसंत हंकारेंचे व्याख्यान

## कर्तबगार महिलांचा होणार सन्मान

▲ पाटण, दि. २६ : महिला दिनाचे औचित्य साधून पाटण येथील आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने शुक्रवार दि. २८ रोजी कोयना एज्युकेशन सोसायटीच्या हॉटेल मॅनेजमेंटच्या मैदानावर 'भरकटलेली तरूणाई व समजलेले आई-बाप समजून घेताना' या विषयावर समाज परिवर्तन प्रबोधनकार प्रा. वसंत हंकारे यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याचा लाभ परिसरातील विद्यार्थ्यांनी, युवकांनी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत प्रतिवर्षाप्रमाणे ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधत पाटणमधील यशस्वी व कर्तबगार महिलांचा सत्कार सोहळा तसेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना तसेच पालक व पंचक्रोशीतील ग्रामस्थांसाठी, सुसंस्कृत पिढी घडविणे, आपल्या आई-वडिलांचे व गुरूजनांचे जीवनातील महत्त्व समजून देण्यासाठी, मोबाइलच्या विळख्यात गुरफटलेल्या तरूणाईला बाहेर काढण्यासाठी आणि विद्यार्थी व पालक यांच्यातील नाते घट्ट करण्यासाठी हे व्याख्यान आयोजित केले आहे.

या प्रबोधनात्मक व प्रेरणादायी व्याख्यानाचा पाटण शहरातील, पंचक्रोशीतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आधार जनसेवा सामाजिक संस्थेमार्फत करण्यात आले आहे.